पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.
काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
e-mail :sp.washim@mahapolice.gov.in Website:www.washimpolic

.....
.....

दिनांक :– ०७/०१/२०२५

प्रेस नोट

पोलीस विभागाकडुन फिर्यादीस मुद्देमाल परत

पोलीस स्थापना दिनाचे अनुषंगाने रेझींग डे सप्ताह साजरा केल्या जातो त्या निमीत्ताने वेगवेळया कार्यक्रमांचे आयोजन पोलीस विभागातर्फे केल्या जाते. आज दि.०७.०१.२०२५ रोजी मा.पोलीस अधीक्षक वाशिम श्री. अनुज तारे यांचे संकल्पनेतुन फिर्यादीस "मुद्देमाल परत मोहीम" राबविण्यात आली. वाशिम जिल्हयामध्ये चोरी, घरफोडी, दरोडा सारख्या गुन्हयातील तसेच मोबाईल, मोटार सायकल व इतर किंमती साहीत्य चोरीच्या गुन्हयातील मुद्देमाल अथवा नागरीकांकडुन गहाळ झालेला किमती मुद्देमाल पोलीस विभागाकडुन सर्व तपास कौशल्य पणास लावुन मुद्देमाल हस्तगत करुन फिर्यादीस परत केल्या जातो.

"मुद्देमाल परत मोहीम" मुळे अगोदरच मालमत्तेच्या नुकसानीमुळे त्रस्त असलेल्या फिर्यादींना दिलासा मिळेल व पोलीस जनता सलोखा निर्माण होवुन जनतेशी विश्वासपुर्ण संबंध निर्माण होतील, संबंधीत गुन्हयातील मुद्देमाल हा मुळ मालकांना परत मिळाला पाहीजे त्यासाठी फिर्यादीला वारंवार पोलीस स्टेशनला चकरा माराव्या लागु नये या कल्पनेतुन "मुद्देमाल परत मोहीम" चे नियोजनबध्द पध्दतीने आयोजन करण्यात आले.

"मुद्देमाल परत मोहीम" मध्ये एकुण ६९ गुन्हयातील सायबरचे ३०४ प्रकरणांतील ३८६ मुद्देमाल ज्यामध्ये

सान्याचांदीचे दागीने १६,०५,१८८ /– रुपये,
३२ मोटार सायकल १३,१०,०००/– रुपये,
मोबाईल ३०,००,०००/– रुपये,
तार ३,२००/– रुपये,
नगदी नोटा १४,५८,०००/– रुपये,
चारचाकी वाहने ५१,२०,०००/– रुपये,
धान्य ९६,४००/– रुपये,
घरगुती साहीत्य व इतर २,९४,१८५/– रु.

असा एकुण १,२८,८६,५७३/– रुपयांचा मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यात आला आहे. चोरी गेलेल्या एवढा मोठया रक्कमेचा मुद्देमाल परत करण्याची वाशिम जिल्हयाच्या इतिहासातील ही पहीलीच वेळ आहे. आजच्या "मुद्देमाल परत मोहीम" ला मिळालेला प्रतिसाद तसेच मुद्देमाल परत केल्यामुळे फिर्यादींचे चेह–यावर दिसनारा आनंद सर्वांना दिसणारा होता. फिर्यादींनी त्यांचे मनोगत व्यक्त करतांना समाधान व्यक्त करुन पोलीस विभागाचे आभार मानले आहे.

नागरीकांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असणा–या लोकउपयोगी कार्यक्रमांचे आयोजन वेळोवेळी करणार असल्याचे मा. पोलीस अधीक्षक श्री.अनुज तारे यांनी सांगीतले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.